# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




**परीक्षा व मूल्यमापन मंडळ — Board of Examinations and Evaluation**

Ref. No. PAHSUS/EXAM/२०२३/1650 Date : 20/07/2023

## परिपत्रक

विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, मार्च/ एप्रिल २०२३ या सत्रातील विद्याशाखांच्या अभ्यासक्रमासाठी घेण्यात आलेल्या परिक्षाकरिता विद्यार्थ्यांना द्याव्या लागणाऱ्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) आणि त्यानंतर होत असलेल्या उत्तरपत्रिकांच्या फेरतपासणी (Revaluation) चे काम ऑनलाईन पध्दतीने होणार आहे.

तरी ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी आणि पुनर्मुल्यांकन सुविधा हवी असेल अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या sus.ac.in या संकेतस्थळावर Examination - Apply online for Photocopy/ Verification and Revaluation या मथळयाखाली https://forms.epravesh.com/PAHSUExam या स्वतंत्र Link वर अर्ज करुन दिलेल्या सूचनेनूसार फोटोकॉपी आणि पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज विहित मुदतीत शुल्कासह ऑनलाईन सादर करावेत. सदर अर्ज ऑनलाईन सादर केल्यानंतर उत्तरपत्रिकांची फोटोकॉपीसाठी आपण अर्ज केलेल्या Login मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर अर्ज भरुन झाल्यानंतर ऑनलाईन पध्दतीनेच शुल्क जमा करणे अनिवार्य असून, शुल्क जमा न झाल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणत्याही प्रकारचे छापील अर्ज अथवा संगणकाद्वारे प्रिंट होणारे अर्ज विद्यापीठाकडे पाठवू नयेत. मात्र शुल्क जमा झाल्याची पावती Transaction ID भविष्यातील संदर्भासाठी जपून ठेवावी.

तरी सदर सुविधेचा उपयोग करुन उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी व फेरतपासणीबाबत अर्ज सादर करण्याबाबत महाविद्यालयाने आपल्या स्तरावरुन सर्व परिक्षार्थींना सुचना द्याव्यात ही विनंती. याबाबत काही तांत्रिक अडचण उदभवल्यास **8956787043** या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधवा.

१. पारंपारिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी प्रती उत्तरपत्रिका रु. २००/- आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रती उत्तरपत्रिका रु. ३००/- शुल्क आकारुन नियमानूसार प्रती सत्र केवळ दोन विषयाच्या उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत (फोटोकॉपी) देण्यात येईल. यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत ज्या अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १५ दिवस राहील.

२. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी प्रती उत्तरपत्रिका रु. ५००/- शुल्क आकारुन नियमानूसार प्रती सत्र केवळ २ विषयाच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी करता येईल. यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत छायांकित प्रत मिळाल्यानंतर ०७ दिवस असेल.

३. वरील दिलेल्या मुदतीत कोणत्याही कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत मुदत वाढ दिली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

टिप :- ज्या परिक्षांचे निकाल जाहिर झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना परिपत्रक निर्गमित झाल्यापासून Photocopy साठी 15 दिवसांची मुदत राहील.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रति,

१. मा. प्राचार्य/प्राचार्या/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये
२. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
३. परिक्षा विभाग/Op Exam/Pre Exam/Comp Sec Exam